Private Nursing Schools & Colleges Management Association (Maharashtra State)

Office Address : 3rd Floor Soniya Chamber, Near Seven Hills Over Bridge, Jalna Road, Aurangabad - 431 005. Phone No.: 0240-2329696, 2368182, Mob.: 9422207475
website : www.privatenursingasso.com Email : privatenursingasso@gmail.com

Reg. No.:MAH/14 10/11

Ref. No.: PNSC/Out/2024/63

Date : 29/4/2024

प्रति,

मा. अध्यक्ष / सचिव साहेब,

नर्सिंग डिप्लोमा कोर्स शिक्षण शुल्क समिती,

मुंबई.

Maharashtra State Board of Nursing and Paramedical Education
Inward 20996
Date 30/04/2024

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील ANM/GNM या अभ्यासक्रमाची फीस निश्चितीबाबत व सॉफ्टवेअर / पोर्टल मधील त्रुटींची दुरुस्ती करणेबाबत...**

संदर्भ : १. शासन निर्णय,वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग दि.१३/१२/२०२२.

२. फिस रेग्युलेटींग ॲथोरिटी, मुंबई यांचे दि.२५/१०/२०२३ रोजीचे शिक्षण शुल्क निश्चीती बाबतचे नियम व अटी.

To Mahesh F.R.A 30/4/24

मा.महोदय,

वरील विषयी आपणास विनंती करण्यात येते की, संदर्भ क्र.१ अन्वये ANM/GNM या अभ्यासक्रमाची फीस निश्चीत करण्यासाठी समिती गठीत करण्यात आलेली आहे त्यात येणा-या त्रुटी / अडचणी खालील प्रमाणे सादर करत आहोत.

१. **ANM / GNM व इतर परिचर्या पदविका महाविद्यालयाकडुन शिक्षण शुल्क समितीने आकारावयाचे शुल्क -** शासन निर्णय क्रमांक -संकीर्ण २०२०/प्र.क्र.८९/२०/शिक्षण १ नुसार ANM / GNM व मंडळाशी संलग्नीत इतर पदविका अभ्यासक्रमांची प्रोसेसिंग फीस (नोंदणी शुल्क) रुपये १५०००/- प्रति महाविद्यालय ठरविण्यात आलेली आहे.

तथापी फीस कमी मंजुर होऊन आल्यास महाविद्यालयास अपील करण्याचा अधिकार आहे. या अगोदर नर्सिंग कॉलेज करिता नाममात्र रुपये ५०००/- अपील फीस आकारण्यात येत होती तथापी उपरोक्त शासन निर्णयामध्ये अपील फीससंदर्भात कुठलाही उल्लेख करण्यात आलेला नाही मात्र शिक्षण शुल्क समितीकडुन सदर फिस रुपये ५००००/-

SSS.

(पन्नास हजार रुपये) आकारण्यात येत आहे. सदर फीस ही अवास्तव आकारण्यात येत आहे. कृपया ती कमी करण्यात यावी.

२. **टिचींग व नॉनटिचींग स्टाफच्या पगाराच्या तरतुदीबाबत :-**

शिक्षण शुल्क समितीने सन २०२३-२४ या वर्षाची फीस मंजुरीकरिता सन २०२१-२२ च्या ऑडीट रिपोर्टमधील माहीती भरण्यास सांगीतले होते. आम्ही आपणास नमुद करु इच्छीतो की, सन २०२१-२२,२०२२-२३ व २०२३-२४ या वर्षाच्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती बाबत मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे प्रकरण प्रलंबीत होते या कारणामुळे उपरोक्त ३ वर्षाची शिष्यवृत्ती प्रस्ताव भरण्याच्या कालावधी पर्यंत मिळालेली नसल्यामुळे महाराष्ट्रातील ब-याच नर्सिग कॉलेजच्या स्टाफचा पगार प्रलंबीत होता. प्रस्ताव भरण्याच्या कालावधी पर्यंत सन २०२१-२२ ची प्रलंबीत असलेली पगाराची रक्कम बॅकेमार्फत अदा करुन त्यासंबधीचे पुरावे उदा. बॅकेचे स्टेंटमेंन्ट हायलाईट करुन प्रस्तावा सोबत जोडलेले आहे. संदर्भ क्र.२ च्या नियमावली नुसार सन २०२१-२२ या वर्षाचा स्टाफचा प्रलंबीत पगार प्रस्ताव भरण्याच्या अगोदरच्या तारखेपर्यंत बॅंकेमार्फत अदा केलेला असल्यास व त्यासंबधीचा पुरावा प्रस्ताव सोबत जोडलेला असल्यास सदरील स्टाफचा पगार १०० टक्के खर्चामध्ये समाविष्ट करण्यात येत होता.

परंतु नर्सिंग डिप्लोमा कोर्स शिक्षण शुल्क समितीने प्रस्ताव छाननी करतांना या संबधीच्या नियमाकडे पुर्णता दुर्लक्ष केलेले आहे त्यांनी त्या वर्षातील ९ महीण्याचा स्टाफचा पगार बॅंकेमार्फत अदा केलेला असतांनाही नामंजुर केला असुन खर्चातुन वजा केलेला आहे त्यामुळे बहुतांशी कॉलेजची फीस ही फार कमी प्रमाणात मंजुर झालेली आहे. कृपया याबाबत सखोल चौकशी करुन योग्य तो निर्णय घेण्यात यावा व सदर स्टाफचा पगार ग्राहय धरुन त्याचा खर्चामध्ये समावेश करण्यात यावा. त्यामुळे योग्य ती फीस मंजुर होण्यास मदत होईल.

३. **नॉनटिचींग स्टाफ च्या कपातीबाबत :-**

संदर्भ क्र.२ च्या नियमावलीनुसार नॉन टिचींग स्टाफमध्ये अकांउटंट ,लायब्ररीयन व बस संस्था किंवा कॉलेजच्या मालकीची असल्यास ड्रायव्हर चा पगार ग्राहय धरण्यात येत होता परंतु नर्सिंग डिप्लोमा कोर्स शिक्षण शुल्क समितीने उपरोक्त पदे व त्यांचा पगार वगळले असुन त्यांचा वर्षभराचा पगार खर्चातुन कमी करण्यात आला आहे त्यामुळे संबधीत महाविद्यालयाची फीस कमी मंजुर झालेली आहे त्यामुळे उपरोक्त व्यक्तींचा / स्टाफचा पगार ग्राहय धरुन त्याचा खर्चामध्ये समावेश करण्यात यावा. त्यामुळे योग्य ती फीस मंजुर होण्यास मदत होईल.

Scanned with ACE Scanner

४. **बस / वाहन खर्च ग्राहय धरणेबाबत:-**

संदर्भ क्र.२ च्या नियमावलीनुसार व तेथील अपील मध्ये मंजुर झालेल्या तरतुदीनुसार ज्या महाविद्यालयाच्या नावावर किंवा संस्थेच्या नावावर बस / वाहन खरेदी केलेली असेल तर संबधीत संस्थेअंतर्गत असणा-या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना हॉस्पीटलमध्ये क्लिनीकल फील्ड वर्कसाठी ने-आण करण्यासाठी विना भाडे तत्वावर सदर बस चालत असतील तर संबधीत बस /वाहनाचा डिझेल खर्च,रजिष्टेशन खर्च , वाहन विमा खर्च, वाहन मेन्टेनन्स खर्च व बसच्या ड्रायव्हर चा पगार बँकेमार्फत केलेला असल्यास ग्राहय धरण्यात येतो. परंतु नर्सिंग डिप्लोमा कोर्स शिक्षण शुल्क समितीने सदरचा खर्च अमान्य केलेला आहे तरी तो मान्य करण्यात येऊन त्याचा खर्चामध्ये समावेश करण्यात यावा.

५. **सन २०२१-२२ या वर्षाच्या शेवटी नवीन महाविद्यालयांना मंजुरी मिळालेली असल्यास त्यासंबधीच्या फीस मंजुरीबाबत:-**

सन २०२१-२२ या वर्षाच्या शेवटी ज्या महाविद्यालयांना नवीन मंजुरी मिळालेली आहे अशा महाविद्यालयांना सन २०२३-२४ या वर्षाच्या फीस मंजुरीकरिता सन २०२१-२२ या वर्षाच्या ऑडीट रिपोर्ट मधील माहीती भरने बंधनकारक आहे. परंतु सन २०२१-२२ या वर्षाच्या शेवटी मंजुरी मिळालेल्या महाविद्यालयांचा खर्च अत्यल्प असल्यामुळे सदरील कॉलेजची फीस कमी प्रमाणात मंजुर होणार होती.

नर्सिंग डिप्लोमा कोर्स शिक्षण शुल्क समितीने नवीन मंजुर झालेल्या महाविद्यालयांना पत्र काढुन व सन २०२३-२४ चे पोर्टल चालु करुन त्यामध्ये पुढील सन २०२२-२३ या वर्षाच्या ऑडीट रिपोर्टमधील माहीती भरुन तसेच सन २०२२-२३ च्या टिंचींग व नॉनटिचींग स्टाफची माहीती भरुन व A१ व A२ रिपोर्ट ऑनलाईन सबमिट करण्याबाबत आदेशीत करण्यात आलेले होते त्यानुसार नवीन महाविद्यालयांनी सदरील माहीती ऑनलाईन पध्दतीने भरुन संबधीत कागदपत्रे अपलोड केलेली आहे. परंतु वास्तविक पाहता नवीन महाविद्यालयांनी सन २०२३-२४ या वर्षाची फीस मंजुरी करीता जो प्रस्ताव भरला होता त्यावेळेस रुपये १५०००/- नोंदणी शुल्क ऑनलाईन पध्दतीने अदा केले होते परंतु नंतरच्या नर्सिंग डिप्लोमा कोर्स शिक्षण शुल्क समितीने आदेशित केल्या प्रमाणे सन २०२२-२३ या वर्षाची माहीती भरल्यानंतर सदर पोर्टलवर अजुन १ लाख रुपये भरण्याबाबत सूचविलेले आहे. हि फीस अवास्तव असुन ती कमी करण्यात यावी किंवा निरंक करण्यात यावी व सन २०२३-२४ ची फीस मंजुर करण्यात यावी.

६. **नर्सिंग डिप्लोमा कोर्स शिक्षण शुल्क समितीच्या पोर्टलमधील दुरुस्ती बाबत-**

Scanned with ACE Scanner

नर्सिंग डिप्लोमा कोर्स शिक्षण शुल्क समितीने अधिसुचित केलेले पोर्टल तपासले असता त्यामध्ये UG व PG कोर्सचा समावेश असल्याचे दिसुन आले आहे. वास्तविक पाहता सदर पोर्टलमध्ये UG व PG या कोर्सचा समावेश असणे गरजेचे नाही कृपया तो काढुन टाकण्यात यावा. तो पुढील प्रमाणे **(Note-खालील नमुद पोर्टल दुरुस्तीमध्ये लाल रंगाने नमुद केलेले मुददे हे UG व PG या कोर्ससाठी आवश्यक असुन आपल्यासाठी ते लागु होत नाही कृपया लाल अक्षरातील मुददे पोर्टलमधुन काढुन टाकण्यात यावे.)**

**Part A: Attach Files**

| | |
|---|---|
| 8 | TDS return/statement for salary in Form No. 24Q for quarter-4 along with Annexure II (i.e. Annual Salary Details) duly certified by the college/institute<br>**(Note:- Because salary of Teaching & Non- teaching staff is not taxable. Hence deleted 24Q form quarter-4 )** |
| 21 | Fees collected from students admitted from NRI/Management/ Institutional quota in the prescribed proforma as per Annexure – B<br>**(Note:- Not applicable for ANM & GNM course )** |

**Part B: Expenses-Attach Files**


| | | |
|---|---|---|
| 7 | University Affiliation Fee | Upload the receipt showing acknowledgement of Affiliation Fees paid to the University |
| 8 | Eligibility fees | Upload - Receipt of payment made to university (Students X Eligibility Fee per Student = Total) |
| 9 | Exam Fee paid to University | Upload - Receipt of payment made to university (Students X Exam Fee per Student = Total) |
| 19 | The processing fee paid to NAAC / NBA / NIRF /NABH/NABL etc. for accreditation (if applicable). | Upload Payment to be supported with documentary proof |

**Note: Because ANM & GNM course's competent authority is MSBPNE. Not University.**

Scanned with ACE Scanner

# Software changes

## Form B: Institute Courses and Programs:-



Online Fee Approval Proposal P... × Fees Regulatory Authority × WhatsApp ×

ndcsss.info/ay2324//userindex.php

To get future Google Chrome updates, you'll need Windows 10 or later. This computer is using Windows 7. Learn more

Abbreviations Used : -
D:- Duration in Years
LE:- Lateral Entry Sanction Intake
OR:- On roll Students

Important Instructions

1. The option of No Upward Revision will be available for any course/courses for which the fee was approved by the Fees Regulating Authority in the immediate previous year and the institute is willing to continue to apply the same fees structure for such course for the next academic year as provided under section 14(1)(b) of the Maharashtra Unaided Private Professional Educational Institutions ( Regulation of Admissions and Fees) Act, 2015.

2. The submission of online proposal shall be mandatory even if the institute opts for No Upward Revision for any course/courses.

3. No communication in the form of letter/email or any other form shall be entertained in respect of No Upward Revision.

4. If the institute wants to retain the fees approved for the academic year 2022-23 then select NO otherwise select, Yes to submit the fees proposal for the academic year 2023-24.

Upward Revision Form

| Sr No | Stream | Upward Revision Status 2022-23 | Upward Revision For A.Y.2023-24 |
|---|---|---|---|
| 1 | ANM | | YES |
| 2 | GNM | | YES |

Confirm

17:50 14-07-2023

**Note: There is two options: Yes for upward revision & No for No-upward revision in form B by FRA software of Bandra Office. However by NDCSSS there is only one option which is yes for upward revision, we also need No option for no-upward revision.**

## Form B9:

**Point 23 –** There is only 3 years for GNM and 2 years for ANM , so remove another 2 column which is not necessary .

| 23 | Fees collected during last year per student for UG course | |
|---|---|---|
| Year | No of Students | fees collected(Rs.) |
| | 2021-22 | |
| 1st Year | 0 | 0 |
| 2nd Year | 0 | 0 |

Scanned with ACE Scanner

| | |
|---|---|
| ...Year 0 | 0 |
| ...Year 0 | 0 |
| ...Year 0 | 0 |

Point 24, 25 & 26- (Delete mention below detail because there no any PG course )

**Fees collected during last year per student for PG course**

**2021-22**

| | |
|---|---|
| 0 | 0 |
| 0 | 0 |

Fees collected (2021-22) per student for UG/PG course — UG Course - 0 ; PG Course - 0

| No of Students of 1st year | Average fees collected per student(Amount in Rs.) | Total fees collected (Amount Rs... |
|---|---|---|
| ...ndian (Govt. Quota + ...anagement) | 0 | 0 |
| PIO + Foreign National | 0 | 0 |

Fees proposed for each course during 2023-24.

**-:Changes in Staff Detail Form :-**

**Form 16***

**IT Return File***

-

**Approved by university or Competent Authority***

**Date of Approval And Reference No**

**Name of Approving Authority**

Scanned with ACE Scanner

# Changes in Depreciation schedule

**Rate as per audit report (A1 – A2 form's)**

| Rate of Depreciation for the Financial Year 2021-22 | |
|---|---|
| Computer | 25% |
| Books | 25% |
| Plant & Machinery (Definition as per Income Tax Act, 1969) | 10% |
| Furniture & fixtures (Definition as per Income Tax Act, 1969) | 10% |

**Rate as per Software**

| Rate of Depreciation for the Financial Year 2021-22 | |
|---|---|
| Computer | 25% |
| Books | 25% |
| Machinery | 15% |
| Furniture | 15% |

**(Note :- Please suggest which form is applicable from above. )**

तरी आपणास याव्दारे विनंती करण्यात येते की, वरील सर्व मुदयांचा सांगोपांग विचार करुन आपल्या स्तरावर योग्य तो निर्णय घेऊन नर्सिंग महाविद्यालयांना व त्यामध्ये शिक्षण घेत असलेल्या असंख्य मागासवर्गीय विद्यार्थीनींना योग्य तो न्याय मिळवुन देण्यात यावा.

अध्यक्ष,

डॉ.बाळासाहेब पवार 8329400007

प्रायव्हेट नर्सिंग स्कुलस ॲण्ड कॉलेजेस मॅनेजमेंन्ट असोशिएशन

9422207475

मो.नंबर ८३२९[illegible]

President
Private Nursing Schools & Colleges
Managment Association (MS)

Scanned with ACE Scanner

# परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समिती

विद्यार्थी परिचारिका वसतिगृह इमारत, तळ मजला,सेंट जॉर्जेस रूग्णालय आवार, पी.डीमेलो रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
वेबसाईट: msbnpe.org ई-मेल- ppasss२०२२@gmail.com ,मो. नं: ०२२ २२६११०१५

**NURSING DIPLOMA COURSE SHIKSHAN SHULKA SAMITI**

Student nurses hostel building, Ground floor, St. Georges hospital campus, p.d'melo road, Fort, Mumbai-४०० ००१
website: www.ndcsss.info.com e-mail- ppasss2022@gmail.com, mobile no- ०२२ २२६११०१५


---

परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समिती

Private Nursing Schools & Colleges Management Association (Maharashtra State) **यांच्या** शुल्क निश्चितीबाबत व पोर्टल मधील दुरुस्तीबाबत शिक्षण शुल्क समितीचे स्पष्टीकरण-

संदर्भ [-1) PNSC/out/2024/63 Private Nursing Schools & Colleges Management Association (Maharashtra State) यांचे पत्र दि. **२९/०४/२०२४.**

१) **ANM/GNM व इतर परिचर्या महाविद्यालयाकडून शिक्षण शुल्क समितीने आकारावयाचे शुल्क**-अपील करावयाचे शुल्क रु. ५००००/- अवास्तव आहे. ती कमी आकारण्यात यावी.

--१) शिक्षण शुल्क प्राधिकरणाच्या धर्तीवर अपील करावयाचे शुल्क ठरविण्यात आलेले आहे. अपील शुल्क रु. ५००००/- (रु.पन्नास हजार फक्त)/ अभ्यासक्रम (course). संदर्भ - शिक्षण शुल्क प्राधिकरण बैठक दि.१६/११/२०२२.

२) **टीचिंग व नॉन-टीचिंग स्टाफच्या पगाराच्या तरतुदीबाबाबत** - सन २०२१-२२, २०२२-२३ व २०२३-२४ या वर्षाच्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीबाबत मा. उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद येथे प्रकरण प्रलंबित होते. या कारणामुळे उपरोक्त ३ वर्षाची शिष्यवृत्ती मिळाली नसल्यामुळे बऱ्याच नर्सिंग कॉलेजच्या स्टाफचा पगार प्रलंबित होता. प्रस्ताव भरण्याच्या कालावधीपर्यंत सन २०२१-२२ ची प्रलंबित असलेली पगाराचो रक्कम बँकेमार्फत अदा करून त्यासंबंधीचे पुरावे (बँक स्टेटमेंट) जोडले गेलेलं आहे. शुल्क नियामक प्राधिकरण यांच्या दि.२५/१०/२०२३ च्या मानकांनुसार हा खर्च समाविष्ट केला जात होता. परंतु परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समितीने सदर खर्चातील केवळ ३ महिन्यांचा पगार ग्राह्य ठरविण्यात आला आहे.याबाबत योग्य निर्णय घेण्यात यावा.

--१) परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समितीने अदा न केलेल्या वेतनातील केवळ ३ महिन्यांच्या वेतनाची रक्कम ग्राह्य ठरविण्यात आलेली आहे.

२)शुल्क नियामक प्राधिकरण यांनी वर्ष २०२४-२५ करिताच्या मानकात (norms) सदर नियमांचा उल्लेख केलेला आहे. यापूर्वीच्या नियमात असा उल्लेख आढळून येत नाही.

३) **नॉन-टीचिंग स्टाफच्या कपातीबाबत-** नॉन टीचिंग स्टाफ मध्ये अकाउंटंट, लायब्रेरियन व ड्राइवर यांचे वेतन ग्राह्य धरण्यात आलेले नाही.

--१) भारतीय परिचर्या परिषद यांच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार टीचिंग व नॉन-टीचिंग यांची संख्या ग्राह्य धरण्यात आलेली आहे.
२) नॉन टीचिंग स्टाफ मध्ये अकाउंटंट, लायब्रेरियन व ड्राइवर यांचे वेतन ग्राह्य धरण्यात आलेले आहे.

४) **बस/वाहन खर्च ग्राह्य धरणेबाबत**-महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना हॉस्पिटलमध्ये क्लीनिकल फिल्ड वर्कसाठी ने-आण करण्याकरिता सादर खर्च येतो.

--१) सादर कागदपत्रांच्या आधारावर सदर खर्च मान्य करण्यात आलेला आहे. योग्य कागदपत्रे सादर नसल्यास सदर खर्च नामंजूर केला गेला आहे.

५) **सन २०२१-२२ या वर्षाच्या शेवटी नवीन महाविद्यालयांना मंजुरी मिळालेली असल्यास त्यासंबंधित फीस मंजूरीबाबाबत**-सन २०२१-२२ या वर्षाच्या शेवटी ज्या महाविद्यालयांना मंजुरी मिळालेली आहे अशा संस्थांचा खर्च अत्यल्प असल्यामुळे अशा संस्थांना २०२२२-२३ च्या अनुषंगाने प्रस्ताव सदर करण्यास आदेशित केले गेले व त्याकरिता सदर पोर्टलवर १ लाख रुपये भरण्याबाबत सुचविले आहे. सदर फी कमी करण्यात यावी अथवा निरंक करण्यात यावी.

--१) सन २०२१-२२ या वर्षाच्या शेवटी ज्या महाविद्यालयांना मंजुरी मिळालेली आहे अशा संस्थांचा खर्च अत्यल्प असल्यामुळे अशा संस्थांना २०२२२-२३ च्या अनुषंगाने प्रस्ताव सदर करण्यास आदेशित केले गेले व या संस्थांना सुरुवातीस प्रस्ताव सादर करताना भरलेल्या रु.१५०००/- या शुल्काव्यतिरिक्त कोणतेही शुल्क आकारलेले नाही. केवळ सिस्टिममध्ये त्याची विलंब तारखेनुसार नोंद होते.सदर बाब हि संस्थांना मेलद्वारे कळविण्यात आलेली आहे.

- परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समिती